# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १३६/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. यशवंत बाबू चव्हाण,<br>मु.पो. बोरगांव, ता. तासगांव, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडल कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण विभागीय कार्यालय, सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, तासगांव, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. यशवंत बाबू चव्हाण, मु.पो. बोरगांव, ता. तासगांव, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार आपले प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत वितरण कंपनी तासगांव उप विभाग, सांगली ग्रामीण विभागा विरुध्द तक्रार दि. २४.१०.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार ग्राहकाने यांनी आपल्या शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. १.४.२०११ रोजी अर्ज केला, परंतु आजतागायत चलन मिळाले नाही. वि.प.ने दि. ६.१०.२०११ ला ग्राहकाकडून नवीन अर्ज मागणी केली. लगेचच चलन रु. २६००/- देण्यात आले, ते ग्राहकाने दि. ६.१०.२०११ रोजी पावती क्र. ४३८२४५५ नुसार भरले. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार त्यांनी चाचणी अहवाल दि. ८.१०.२०११ रोजी दिला आहे. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १६.८.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने आदेश केले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत - दि. १.५.२०११ ते ६.१०.२०११ या २३ आठवड्यांच्या कालावधीतील विलंबासाठी रु. २३००/- भरपाई मिळावी. कृती मानके विनियमानुसार वितरण वाहिनीचा विस्तार करुन वीज पुरवठा द्यावयाचा असलेने हा वीज पुरवठा तीन महिन्यात मिळणार असेल तर भरपाई बिलातून समायोजित करुन मिळावी. ग्राहकास रितसर वाहिनी योग्य पध्दतीने उभी करुनच वीज पुरवठा हवा आहे व तो मिळण्यास विलंब होणार असेल तर ही भरपाई रोख स्वरुपात मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने नोटीस देऊनही मुदतीत दि. ११.११.२०११ पर्यंत आपला लेखी अहवाल सादर केला नाही, तो दि.१०.१.२०१२ रोजी सादर केला. त्यामध्ये ग्राहकाच्या कनेक्शनसाठी ३ पोलची लाईन ओढून दि. १०.२.२०१२ पर्यंत म्हणजे १ महिन्याच्या आत जोडणेत येईल. कनेक्शन जोडलेनंतर त्याची कागदपत्रे मंचास सादर करीत आहोत असे नमूद केले आहे.

प्रस्तुतची तक्रार दि.१०.१.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी उपस्थित. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता श्री. तिळवे, कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी उपस्थित. ग्राहक प्रतिनिधींनी मंचासमोर असे प्रतिपादन केले की, वि.प.च्या अधिकाऱ्यांनी कबूल केल्याप्रमाणे ३ पोलची लाईन उभी करुन दि. १०.२.२०१२ पूर्वी सुरक्षित वीज पुरवठा केला, तर ग्राहक भरपाईची मागणी सोडून देत आहे. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी ३ पोलचे लाईनचे काम करुन दि. १०.२.२०१२ पूर्वी वीज जोडणी देत मंचासमोर सांगितले.

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार ग्राहकाने नवीन शेतीपंप वीज जोडणीसाठी दि. १.४.२०११ लाअर्ज करुन दि. ६.१०.२०११ रोजी वि.प.ने दिलेले चलन त्याचदिवशी भरले आहे. कृती मानके विनियमातील ४.२ तरतुदीनुसार ग्राहकाचा अपूर्ण अर्ज असेल तरीही वि.प.ने तो प्रोसेस करुन ग्राहकास मुदतीत चलन देणे आवश्यक होते. वि.प. कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यातअपयशी ठरल्यामुळे ग्राहक भरपाई मिळण्यास हक्कदार आहे व वि.प.ची ती जबाबदारी आहे.विलंबाबाबत वि.प.ने कुठलाही खुलासा केला नाही. ग्राहकाच्या कामाचे स्वरूप पहातां, ३ पोलचे काम १ महिन्यात म्हणजेच दि. १०.२.२०१२ पूर्वी करुन ग्राहकाला वीज जोडणी देण्याचे लेखी अभिवचन वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दिले आहे. वि.प.ने ठरलेल्या मुदतीत सुरक्षित वीज पुरवठा केला तर भरपाईची रक्कम रु. २३००/- ग्राहक सोडून देण्यात तयार असल्याचे ग्राहक प्रतिनिधींनी मंचासमोर सांगितले. यदाकदाचित ग्राहकाचे काम दि. १०.२.२०१२ पूर्वी होऊन वीज पुरवठा दिला नाही तर ग्राहकाचा भरपाई मागणीचा हक्क अबाधीत राहतो. खालील प्रमाणे आदेश -

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

# आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी उप विभाग तासगांव, सांगली ग्रामीण विभाग यांनी ग्राहकास दि. दि. १.५.२०११ ते ६.१०.२०११ या २३ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. २३००/- भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम रोखीने ग्राहकास द्यावी.

३) सहाय्यक अभियंता श्री. तिळवे यांनी मंचासमोर लेखी कबूल केल्याप्रमाणे दि. १०.२.२०१२ पूर्वी ३ पोलची लघुदाब वाहिनी उभी करुन सुरक्षित वीज पुरवठा दिल्यास ग्राहक भरपाईची मागणी करणार नाही. तसा मुदतीत वीज पुरवठा न केल्यास ग्राहक वि.प.विरुध्द भरपाईची मागणी करु शकतो.

४) सहाय्यक अभियंता श्री. तिळवे यांनी मंचासमोर लेखी कबूल केल्याप्रमाणे ग्राहकाचे काम पूर्ण करुन दि. १०.२.२०१२ पूर्वी वीज पुरवठा करावा व त्याचा कार्यपूर्ती अहवाल त्वरित मंचास सादर करावा.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com